बीड । महाराष्ट्र
बुधवार दि.१८/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३१८
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com










## सोशल मीडियावर टशन; स्टेट्सवरून राडा

# तरुणाच्या हत्येनं खळबळ



**आष्टी । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात वर्षभरापासून गुन्हेगारी कमी होण्याचे नाव घेत नाहीये. बीड जिल्ह्याचा बिहार झाला आहे का असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. खून, हत्या, किरकोळ कारणावरून चाकूने भोसकून रक्ताच्या थारोळ्यात पाडणे हे आता बीडमध्ये नेहमीचे झाले आहे. आज पुन्हा एकदा गंभीर घटना घडली आहे. आष्टी तालुक्यातील रूईनालकोलमध्ये सोशल मीडियावर एकमेकांच्या विरोधात स्टोरी/स्टेटस टाकण्याच्या कारणावरून कुरापत काढून झालेल्या वादामध्ये तिघांवर धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले.**



उपचारासाठी घेऊन जाताना यामधील एकाच मृत्यू झाला, तर इतर दोघेजण गंभीर जखमी आहे. ही घटना सोमवारी रात्री घडल्याचे पोलिसांनी सांगितले. दिपक शिवाजी नालकोल वय (वर्ष २०) रा. रूईनालकोल ता. आष्टी असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. जखमी असलेल्या इतर दोघांवर अहिल्यानगर येथील खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळाळलेल्या माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील रूईनालकोल येथील जि.प.शाळेच्या समोर सोमवारी तरूणाच्या दोन गटात इंन्टाग्राम, व्हाटसअॅपवर एकमेकांच्या विरोधात स्टोरी टाकण्याच्या कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि एका गटातील तरूणांनी तिघा जणांवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याने तिघे गंभीर जखमी झाले. जखमी तरूणांना उपचारासाठी घेऊन जाताना दिपक नालकोलचा यामध्ये मृत्यू झाला. २ जखमी तरूणांवर अहिल्यानगर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलले जात आहे. घटनास्थळी आष्टीचे सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, विक्रांत हिंगे, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, याच्यासह अंमलदारांनी भेट दिली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### जाब विचारल्याने चाकूने वार



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील माळे गल्लीत राहणारे शाम पुरुषोत्तम जमदाडे वय ४९ वर्ष यांच्यावर चाकूने हल्ला करून तिघांनी बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. १७ फेब्रुवारी) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास बलभीम कॉलेज ते मिल्या कॉलेज या गल्लीदरम्यान घडली.या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. प्राथमिक मिळालेल्या माहितीनुसार, जमदाडे यांच्या मुलीला परिसरातील एका तरुणाकडून वारंवार फोन करून त्रास दिला जात होता. यापूर्वीही काही महिन्यांपूर्वी संबंधित तरुणाविरोधात शहर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. मात्र ते प्रकरण समेटाने मिटविण्यात आल्याचे सांगितले जाते. तरीदेखील संबंधित तरुणाने पुन्हा मुलीला त्रास देणे सुरूच ठेवले होते. या पार्श्वभूमीवर शाम पुरुषोत्तम जमदाडे यांनी त्या तरुणाला जाब विचारला असता,त्याने जमदाडे यांच्यावर चाकूने वार करून मारहाण केली. या हल्ल्यात जमदाडे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. संबंधित आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. दरम्यान, बीड शहरात वाढत्या हाणामारी, खून व गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलीस प्रशासनाचा धाक कमी झाल्यानेच अशा प्रकारच्या घटना वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून, शहरात कायदा सुव्यवस्था ▶▶ पान २ वर

## धनंजय मुंडेंना मंत्री केल्यास

# राष्ट्रवादी पक्ष संपेल



**मुंबई । वृत्तसेवा**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका केली. धनंजय मुंडे यांची माझ्या जवळ २२ प्रकरण आली आहेत. त्यामुळं तू शहाणा हो, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. धनंजय मुंडेंना मंत्री केल्यास राष्ट्रवादी पक्ष संपेल असेही जरांगे म्हणाले. फक्त मंत्रिपद द्यायचं म्हटलं होतं तर अजितदादांचा पक्ष एवढा ट्रोल झाला होता. त्यामुळं मंत्रीपद दिलं तर पक्ष संपेल, भाजप कशाला हाताने हे गळ्यात गुंतून घेईल अशी टीका जरांगेंनी मुंडेंवर केली.

### भाजप का मंत्रीपद देईल?

रक्ताने हात भरलेल्या लोकांना सरकार का सांभाळेल? भाजपमध्ये गेले तरी भाजप का मंत्रीपद देईल? असे सवाल करत जरांगेंनी मुंडेंवर टीका केली. संतोष भैया देशमुख यांना अजून न्याय नाही, त्यांचा खून करण्यात आला त्याच्याच कार्यकर्त्यांकडून आणि त्याला मंत्रिपद देणार का? असा सवाल जरांगे यांनी केला. राष्ट्रवादी तर देणार नाही कारण देण्या अगोदर त्यांचे एवढे हाल आहेत तर दिल्यावर तर पूर्ण पक्ष संपेल. रक्ताने हात भरलेल्या लोकांवर कधीच बोलायचं नाही यामुळे माझा दिवस चांगला जात नाही. घातपाताच्या सुपारी देऊन त्याने पुन्हा आमचेच लोक स्टॅन्ड केले आहेत? आम्ही पूर्ण माहिती घेत आहोत. काळजी करु नको अजूनही सांगतो धन्यानं आमच्या नादी लागू नये असा इशारा जरांगेंनी दिला.

### माझ्याजवळ २२ पेक्षा अधिक प्रकरणे-मनोज जरांगे

मी एकच बोललो आहे अजून तू यातून सावध हो रंजना प्रदीप नागपूरकर ही महिला आज सकाळी येऊन माझ्या घरी खूप रडत होती. तिचा नवरा देखील मेलेला आहे, याच्याच टेन्शनमुळे हे देवेंद्र फडणवीस साहेबांना माहीत नसेल. तुमच्याच पाहुण्यांना मला असं वाटतं फडणवीस साहेबांच्या आई आहेत शोभाताई फडणवीस, या महिला त्यांच्याच ▶▶ पान २ वर

## जिल्ह्यात सव्वा बाराशे दारू दुकाने असताना

# नवीन देऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडवु नका

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात दारुने मोठे नुकसान झालेले आहे. राज्यात सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यामध्ये होत आहेत. अशा परिस्थितीत दारू आणखी विकली गेली तर त्याचे समाज विघातक परिणाम होतील. बीड जिल्ह्यात होलसेल दारू दुकाने. बियर बार. बिअर शॉपी. देशी दारू दुकाने यांची संख्या जवळपास साडेबाराशे इतकी आहे. त्यातच दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या दालनात होणाऱ्या बैठकीत आणखी दुकाने मंजूर झाली तर गाव तेथे दारू दुकानाची शाखा अशी परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी आता एकही दारू दुकानाला मंजुरी देऊ नये, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा



हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष अॅड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे. बीड जिल्ह्यामध्ये दारू दुकानांना मंजुरी देऊ नये, म्हणून आम्ही सातत्याने प्रयत्न केला आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यात आजपर्यंत दुकान दिल्याची माहिती आम्हाला मिळालेली नाही. त्याचप्रमाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे देखील काम चांगले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कॉपीमुक्त परीक्षेसाठी केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. अशा परिस्थितीत या अधिकाऱ्यांनी दारू दुकाने वाढू नयेत, यासाठी देखील लक्ष देणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्यात आज मित्तीला ८१६ बियर बार, ३१४ बिअर शॉपी, ७८ देशी दारूची दुकाने आणि दारू विक्रीची ▶▶ पान २ वर

## अनोळखी प्रेत आढळल्याने खळबळ



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी नाका परिसरात मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी एक अनोळखी व्यक्ती मृतावस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. बार्शी रोडवरील हिना पेट्रोल पंप समोर असलेल्या ओएलए ईलेक्ट्रीक दुचाकी शोरूमच्या बाजूला ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. सदर व्यक्ती मृत अवस्थेत आढळून आली असून त्याचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्षे आहे. त्याच्या अंगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर फोटोमधील व्यक्तीची ओळख कोणाला पटत असल्यास त्यांनी पेठ बीड पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, ▶▶ पान २ वर

## सतीश मुंडे हत्या प्रकरणातील पाच आरोपींना

# तीन दिवसांची पोलिस कोठडी



**केज । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यातील चोरखळी येथील कला केंद्रावर मारहाणीत झालेल्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील औषध विक्रेता सतीश मुंडे मृत्यू प्रकरणातील अटक असलेल्या पाचही आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. बीड जिल्ह्यातील साळेगाव ता. केज येथील औषध विक्रेते सतीश मुंडे हे दि. १२ फेब्रुवारी रोजी त्यांच्या मित्रा सोबत धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील महाकाली कला केंद्रावर नाचगाणे पाहण्यासाठी गेले होते. तिथे दारूच्या नशेत त्यांच्या भांडण झाले. त्या भांडणाचा व मागील काही वर्षापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून गावाकडे ▶▶ पान २ वर

## संपादकीय

# सातत्यपूर्ण पाठबळ हवे

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले. केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा नॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे. आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादित न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.

# नारळ लागवडीतून अर्थव्यवस्थेला बळ

समुद्रकिनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे. जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल. आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो. तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत.



तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल. घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात. त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते. नारळाचे जे खोड असते त्यापासून घरासाठी वासे तयार केले जात असून आकर्षक फर्निचरसुद्धा तयार करतात. कोकणात खाडीशेजारी जी बैठी घरे आहेत त्यांना सर्रास माडाचे वासे दिसतील. खारी हवा असल्यामुळे वासेसुद्धा जास्त दिवस टिकतात. तेव्हा नारळाचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शेतीला जोडधंदा आहे. तसेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे असे म्हणावे लागेल.

# २ वर्षांनंतर महादेव मुंडे हत्या प्रकरणात ट्विस्ट

## मुंडेंनी घेतलं थेट वाल्मिक कराडचं नाव, बंगल्यावरची पोरं कोण?

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील परळी येथे प्रसिद्ध व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येप्रकरणी आता मोठी अपडेट समोर आली आहे. आता या प्रकरणी त्यांच्या कुटुंबियांनी गंभीर आरोप केले आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार वाल्मीक कराडचे देखील मुंडे खून प्रकरणात नाव समोर आले आहे. मुंडे याच्या हत्येला आता दोन वर्षे पूर्ण झाली असून यामध्ये खळबळजनक खुलासे केले जात आहे. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. एसआयटी स्थापन करून सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी मुंडे यांच्या पत्नीने केली होती. तसेच पोलीस अधिकाऱ्यांवर त्यांनी गंभीर आरोपही केले आहे. आता पर्यंत सहा जणांची ब्रेन मॅपिंग तर उद्या तीन जणांची नार्को टेस्ट होणार असल्याची माहिती मिळाली आहे. आतापर्यंत तपासावर मुंडे यांच्या पत्नीने भाष्य करत खळबळजनक आरोप केले आहे. ज्या आरोपींची ब्रेन मॅपिंग पॉझिटिव्ह आली आहे, त्यांची उद्या नार्कोटेस्ट होणार आहे. डखढ आणि खझड पंकज कुमावत यांनी पारदर्शक असा तपास केला आहे. ज्यांची ब्रेन मॅपिंग पॉझिटिव्ह आली आहे. ते सर्व वाल्मीक कराड यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेले संशयित आरोपी आहेत. वाल्मीक कराड याने तपास थांबवला होता. असा गंभीर आरोप त्यांनी केला. तसेच त्यांच्या संबंधित असलेले संशयित आरोपींचे ब्रेन मॅपिंग पॉझिटिव्ह कसे आले. मात्र पोलिसांनी पारदर्शक असा तपास केला आहे. घटना घडल्यानंतर सहा महिने मी घरीच होते स्थानिक पोलिसांनी घरी येऊन माझा जवाब नोंदवला परळी पोलिसांनी तपासात खूप दिरंगाई केली. बंगल्यावरील फोन मुळे तपास थांबवला गेला होता. मात्र मला न्याय पाहिजे आणि आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. न्यायासाठी मी जेव्हा विष प्राशन केले तेव्हा बंद केलेली फाईल तपासासाठी सुरू करण्यात आली. या न्यायामध्ये मला जरांगे पाटील आणि अनेक राजकीय लोकांचे पाठबळ मिळाले असून जरांगे पाटलामुळे मी मुख्यमंत्र्यांना भेटू शकले. मुख्यमंत्र्यांनीही मला एसआयटी स्थापन करून खूप मदत केली आहे.



## पान १ वरून

### माझ्याजवळ २२ पेक्षा ...

घरातल्या नातेवाईक आहेत असे जरांगे म्हणाले. मी फक्त त्याला संदेश दिला आहे की तुझे पण खूप प्रकरण माझ्याकडे आली आहेत. तू आमच्याच लोकांना घातपाताच्या सुपार्या देत आहे, ते गप्प बसलेले होते तरी तुझ्याच टोळीने कसं उचकवलं त्यांना पुन्हा. माझे काहीच प्रकरण नाहीत, माझ्यावर केलेल्या प्रत्येक आरोपावर मी जर फौजदारी खटले दाखल केले तर माझ्या विरोधात बोलणाऱ्याला लाईफच भोगावे लागेल जेल मध्ये असे जरांगे म्हणाले. त्यामुळे तू शहाणा हो माझ्या नादी लागू नकोस, मी जर मागे लागलो तर तुझे माझ्याजवळ २२ पेक्षा अधिक प्रकरण आलेली आहेत. * तुझी लाभार्थी टोळी माझ्या विरोधात कशी लावली हे चांगलं माहीत : आमचे लोक घातपात करुन पुन्हा उचकवून देऊ नये त्याने, तुझी एवढी प्रकरणं आहेत माझ्याकडे तरी मी अजून त्यात हात घातलेला नाही. तुझी लाभार्थी टोळी माझ्या विरोधात तू कशी लावली हे मला चांगलं माहित आहे, तू बदनाम करत आहे मला हे देखील मला चांगलं माहित आहे. तुझे एवढी प्रकरण माझ्याकडे आली आहेत, मी अजून त्यात हात घातलेला नाही असे जरांगे म्हणाले. रंजना नागपूरकर नावाची महिला नागपूर वरुन माझ्याकडे आली होती आणि त्यांनी सांगितलेलं एवढं भयानक मॅटर आहे, त्यामुळे तू सावध रहा असे जरांगे पाटील म्हणाले. धन्या तू इथून पुढे तरी माझ्या नादाला लागू नको तुझे खूप प्रकरण माझ्याकडे आली आहेत असे जरांगे म्हणाले.

### जिल्हयात सव्वा बाराशे...

होलसेल ११ दुकाने अशी एकूण १२१९ (बाराशे एकोणवीस) दुकाने आहेत. जिल्ह्यात ग्रामपंचायतींची संख्या १८०० च्या घरात आहे. जर आता आणखी दुकाने मंजूर होत गेली तर गाव तेथे दारू दुकानाची शाखा अशी परिस्थिती होईल. दारूमुळे कुटुंब उध्वस्त होतात. ग्रामीण भागाला याचा मोठा तडाखा बसलेला आहे. घरातला एक माणूस दारूडा निघाला तर काही पिढ्या त्याचे परिणाम भोगतात. त्यामुळे दारुड्यांची संख्या कमी होणे गरजेचे आहे. म्हणून दारू दुकाने वाढू नयेत, यासाठी आमचा सातत्याने प्रयत्न असतो. जिल्ह्यात या दुकानांशिवाय बेकादेशीर रीतीने दारू विकणारे हजारावर दुकाने आहेत. जिल्ह्याला अगोदरच ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून पाहिले जाते. जिल्ह्यात मोठे उद्योग नाहीत. बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याचबरोबर गुंडगिरीने देखील कळस गाठला आहे. आणखी दारू विक्री वाढली तर आणखी गुन्हेगारी वाढेल, अशी चिन्ह आहेत. दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी दारू दुकानांना परवाने द्यायचे किंवा नाही याबाबतची बैठक जिल्हाधिकारी यांनी बोलवली असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. या दिवशी एकाही दुकानाला मंजुरी देऊ नये, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांना देखील या संदर्भात निवेदन देण्यात आले असून एकही दुकान मंजूर होणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करु. दारू दुकान मंजूर करणे हा नियम असला तरी समाजाचा विचार करायला हवा, असे ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## पान १ वरून

### सतीश मुंडे हत्या...

परत येत असताना दि. १३ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री गावाकडे परत येत असताना शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्दन गित्ते आणि दत्ता बाबासाहेब तोंडे त्यांनी संगनमत करून सतीश मुंडे यास छातीत व पोटात लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्या मारहाणीतच सतीश मुंडे यांचा मृत्यू झाला. सतीश मुंडे याचा मृत्यू झाल्या नंतर शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी याने रात्री १:०० वाजण्याच्या सुमारास सतीश मुंडे याला त्याच कारमधून साळेगाव येथे त्याच्या घरी घेऊन आला. घरी आल्या नंतर सतीश मुंडे यांच्या आई वडीलांना त्याने सांगितले की, सतीश मुंडे हा खूप दारू पिलेला असल्याने तो बेशुद्ध पडला आहे. सतीश मुंडे यांच्या वडिलांनी सतीश यास आवाज दिला असता त्याने काही हालचाल केली नाही किंवा प्रतिसाद दिला नाही. म्हणून सतीश मुंडे यांचे वडील, चुलते आणि चुलत भाऊ यांनी सतीश मुंडे याला केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घेऊन गेले. परंतु तेथील कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी त्यांना अंबाजोगाई येथे जाण्याचा सल्ला दिला. अंबाजोगाई येथे सतीश मुंडे याला घेऊन गेल्या नंतर स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सतीश मुंडे मयत झाल्याचे घोषित केले. त्या नंतर मयत सतीश मुंडे यांचे वडील भागवत बळीराम मुंडे यांनी दि. १५ फेब्रुवारी रोजी येरमाळा जि. धाराशिव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्दन गित्ते आणि दत्ता बाबासाहेब तोंडे (सर्व रा. साळेगाव ता. केज जि. बीड) यांच्या विरुद्ध गु. र. नं. ३८/२०२६ भा. न्या. सं. १०३, १९१(२), ११५(२) नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्दन गित्ते आणि दत्ता बाबासाहेब तोंडे या पाच जणांना ताब्यात घेऊन अटक केले. या खून प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी कळंब न्यायालयात हजर केले असता सर्व पाचही आरोपींना दि. १८ फेब्रुवारी पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिस कोठडीतील आरोपीं कडून या हत्या प्रकरणातील आणखी काही गुन्हेगारांची नावे उघड होण्याची शक्यता असून मयत सतीश मुंडे याला महाकाली कला केंद्रात आणखी कुणी मारहाण केली हे स्पष्ट होईल. येरमाळा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्या भालू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक स्वप्नील भोजगुडे हे तपास करीत आहेत.

### अनोळखी प्रेत...

असे आवाहन पोलीस हेड कॉन्स्टेबल विलास ठोंबरे व अल्ताफ शेख यांनी केले आहे. संपर्क क्रमांक: ९९२३२७३५६८

### जाब विचारल्याने...

राखण्यासाठी अशा गुंडांची बीड शहरात धिंड काढावी. तसेच अशा घटना रोखण्यासाठी पोलिसांकडून कठोर पावले उचलण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# देवांचे, संतांचे मंदिरे जतन करणे हे आपलं कर्तव्य

## राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांचे मत







**वडवणी । प्रतिनिधी**

देवांचे आणि संतांचे मंदिरे ही आपल्याला जीवनाची पायवाट दाखवत असतात. त्यामुळे आपल्या भागातील सर्व देवतांचे आणि संत महंतांचे मंदिरे यांचे जतन करणे हे आपलं कर्तव्य आहे. यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा असे आवाहन राजा हरिश्चंद्र संस्थान येथे सुरू असलेल्या कीर्तन महोत्सवात काल्याच्या कीर्तनाप्रसंगी महंत भगवान बाबा राजपूत यांनी केले.

जगभरातील एकमेव राजा हरिश्चंद्राचे मंदिर असलेल्या राजा हरिश्चंद्र पिंपरी येथील महाशिवरात्र महोत्सवाची सांगता या तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. कीर्तनासाठी बीड जिल्ह्यासह राज्यभरातून लाखो भाविक माता भगिनी उपस्थित होत्या. महंत राजपूत महाराजांनी सांगितले की भारत देशाला खूप मोठा इतिहास आहे. देव देवतांचे, संत महानतांचे या देशावर खूप मोठे उपकार आहेत. या देशाला खूप मोठी संस्कृती लाभलेली आहे. खूप मोठा विचारांचा ठेवा मानवांसाठी या महापुरुषांनी करून ठेवला आहे. या सर्व सत्पुरुषांची मंदिरे आता देशात आहेत. या सर्व मंदिरांचं संगोपन होणे आवश्यक आहे. कारण ही मंदिरे आपल्याला आणि इथून पुढे जन्म घेणाऱ्या पिढ्यांना जीवनाचा मार्ग दाखवणार आहेत. या मंदिरातून कल्याणकारी मार्ग मानवांना दिसणार आहे. कीर्तनासाठी राज्यातील नामवंत मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे. कीर्तनानंतर तयार करण्यात आलेला शेकडो पोते बुंदी चिवड्याचा महाप्रसाद लाखो भाविकांना वाटप करण्यात आला. यशस्वीतेसाठी राजा हरिश्चंद्र पिंपरी पंचक्रोशीतील हजारो सेवकांनी पुढाकार घेतला.

### ● जिवंत असेपर्यंतच महत्त्व द्या..

आपल्या गावात भागात कितीही मोठा माणूस असला तरी त्याचं महत्त्व आपल्याला वाटत नाही. त्याच्या चांगल्या कार्याचा देखील आपण गौरव करत नाही. मात्र तो माणूस मेल्यानंतर त्याच्या नावाने मोठे मोठे बॅनर लावले जातात. त्याच्या आठवणी काढल्या जातात. जिवंत असेपर्यंत त्या माणसाची कदर करणे आवश्यक असते. त्याला मानसन्मान द्यायला हवा. संत ज्ञानदेव, संत तुकाराम, संत भगवान बाबा, भीमसिंह बाबा यासह अनेक सत्पुरुषांना जिवंतपणे समाजाने प्रेमापेक्षा यातनाच जास्त दिल्या. असेही ते म्हणाले.

### ● या भागात जन्म घेणारे धन्य

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्र या ठिकाणीच ऋषी विश्वामित्र यांच्या मागणीवरून राजा हरिश्चंद्राने आपलं राज्य स्वप्नात दान दिलं होतं. या ठिकाणी संत भगवान बाबा भिमसिंह बाबा यांच्या माध्यमातून महाशिवरात्र महोत्सव संपन्न झाले. आशा पवित्र भूमीत जन्म घेणाऱ्या प्रत्येक नागरिकांनी स्वत:ला धन्य समजले पाहिजे असेही ते म्हणाले.

### ● आ. प्रकाश दादा सोळंके यांच्या वतीने पंधरा लाखाचा निधी

राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्रावर ऋषी विश्वामित्र यांचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिराच्या समोर उभारण्यात येणाऱ्या भव्य सभामंडपासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या आमदार फंडातून १५ लाख रुपयांचा निधी या भागाचे युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांनी जाहीर केला आहे. पुढील महिन्यात सभामंडपाचे काम सुरू होईल, असे असे भगवान महाराज राजपुत यांनी सांगितले.

### नामांकित कीर्तनकार, वादक आणि गायनाचार्यांची हजेरी

या महाशिवरात्र महोत्सवात राज्यातील नामवंत कीर्तनकार निवृती महाराज इंदुरीकर, भगीरथ महाराज काळे, कोमलसिंग महाराज राजपुत धुळे, तुकाराम महाराज मुंडे, कृष्णा महाराज शास्त्री भगवान गडकर यांचे किर्तने झाली तर साल सिद्ध बाबा संस्थानचे मठाधिपती महंत हनुमंत महाराज शास्त्री यांचे किर्तने तर सात दिवस प्रवचन सेवा साल सिद्ध बाबा संस्थानचे मठाधिपती महंत हनुमंत महाराज शास्त्री यांची झाली. महाराष्ट्रातील नामवंत मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे, गायनाचार्य खेडकर गुरुजी आदींची सेवा झाली.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श देवगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श देवगाव येथील वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाले आहे. शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंददायी कार्यक्रम असतो या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालक एकत्र येऊन एकमेकांशी संवाद साधतात, मैत्री वाढवतात आणि एकमेकांच्या यशाचा आनंद साजरा करतात. स्नेहसंमेलनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना वाढवणे आणि शाळेतील सामाजिक वातावरण अधिक सुदृढ करणे हा असतो.स्नेहसंमेलनात



विविध सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, नृत्य, गायन आणि नाट्य सादर केले जातात. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या छुप्या प्रतिभा दाखवण्याची संधी मिळते. तसेच, शिक्षक आणि पालक यांचाही सहभाग असतो, ज्यामुळे शाळा आणि घर यांच्यातील नाते अधिक घट्ट होते. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक यशासाठी पुरस्कारही दिले जातात, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकत्रितपणा आणि मैत्रीची भावना वाढते. हा कार्यक्रम केवळ आनंद साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, तो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. त्यामुळे प्रत्येक शाळा वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन नियमितपणे करते आणि त्याला मोठ्या उत्साहाने सहभागी होते. या वेळी उपस्थित प्रमुख पाहुणे पत्रकार मा. बंडुजी खांडेकर. युवा नेते आनंदजी काळे. सामाजिक कार्यकर्ते मा. जगदीश फरताडे मा. सचिन लंगडे युवा नेते केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर, सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवगाव येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक शालेय समिती अध्यक्ष व उपाध्यक्ष सदस्य व शिक्षणप्रेमी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव अंगणवाडी सेविका/मदतनीस, गावचे माजी/आजी सरपंच. उपसरपंच सदस्य डॉक्टर. वकील विविध क्षेत्रातील मान्यवर. व गावचे नागरिक महिला मंडळी. विद्यार्थी व विद्यार्थिनी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त बीडमध्ये दोन दिवसीय रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या (१९ फेब्रुवारी) जयंतीनिमित्त त्यांच्या शौर्यगाथा, कर्तृत्व आणि स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणादायी इतिहासाचे स्मरण करून देणारे भव्य सांस्कृतिक कार्यक्रम बीड येथे आयोजित करण्यात आले आहेत . सांस्कृतिक कार्य विभाग , सांस्कृतिक कार्य संचालनालय , महाराष्ट्र राज्य , मुंबई आणि जिल्हाधिकारी कार्यालय , बीड यांच्या संयुक्त विद्यमाने हे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून जिल्ह्यातील नागरिकांना इतिहासाच्या तेजस्वी परंपरेचा अनुभव देण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय , मुंबई यांच्या पत्रानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित विशेष कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे . त्यानुसार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ०५.३० ते ०८.३० या वेळेत ऐतिहासिक नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात येणार आहे . छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित दर्या भवानी या नाटकाचा रंगमंचावर भव्य प्रयोग होणार असून सुमारे चाळीस कलाकारांच्या संचाद्वारे हा प्रयोग सादर केला जाणार आहे . या नाट्यप्रयोगातून शिवकालीन पराक्रम , स्वराज्याची उभारणी आणि समुद्रातील धाडसी मोहिमांची कथा प्रेक्षकांसमोर उभी राहणार आहे . यानंतर दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० या वेळेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शाहिरी लोकधारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे . या कार्यक्रमात पोवाडे , शाहिरी गायन आणि ऐतिहासिक गीते सादर करून शिवचरित्रातील पराक्रम आणि प्रेरणादायी प्रसंग रसिकांसमोर जिवंत केले जाणार आहेत . या कार्यक्रमामुळे नव्या पिढीपर्यंत इतिहासाचे संस्कार पोहोचवण्याचा प्रयत्न होणार आहे. हे दोन्ही कार्यक्रम बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पार पडणार असून प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे . जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी , असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे . या उपक्रमातून शिवचरित्राची प्रेरणा समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे . स्वराज्याची संकल्पना , शौर्य , न्यायप्रियता आणि लोकाभिमुख राज्यकारभार या शिवकालीन मूल्यांचा संदेश सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचणार आहे . इतिहास जिवंत ठेवणारा समाजच भविष्य घडवतो या भावनेतून आयोजित करण्यात आलेले हे कार्यक्रम जिल्ह्यातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त होणारे हे सांस्कृतिक सोहळे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित न राहता स्वराज्याच्या तेजस्वी इतिहासाचे स्मरण करून देणारे आणि नव्या पिढीत देशभक्तीची भावना जागवणारे ठरणार आहेत , अशी अपेक्षा व्यक्त होत आहे .

# क्रांती महिला असंघटित कामगार युनियन व कोरो इंडिया यांच्या वतीने महिलांच्या कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न



**गेवराई । प्रतिनिधी**

क्रांती महिला असंघटित कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जगदंबा आय. टी.आय. कॉलेज, गेवराई येथे महिलांसाठी भव्य कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि संघभावना दृढ व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराईचे अध्यक्ष रणवीर काका पंडित, कोरो इंडियाच्या लक्ष्मी ताई वाघमारे, क्रांती महिला संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा शाहीन पठाण, शेर-ए-हिंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शेख आमेर पाशा, कोरोचे विलास मगरे, रुक्मिणी नागापुरे, तेजस्विनी भोर, शिवप्रताप संस्थेचे सुधाकर बुकन सर, निर्धार संस्थेचे नारायण ढवरे सर, रुलर डेव्हलपमेंट संस्थेचे संजय आगळे सर, दै. कार्यारंभचे पत्रकार विनोद नरसाळे व सा. बीड सिटी लाईफचे संपादक शेख अमीन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना रुक्मिणी नागापुरे यांनी केली.

# शिवशंकराची मनोभावे सेवा करा; महाशिवरात्रीच्या निमित्ताने ह.भ.प. बबन देवा जोशी महाराजांचे कीर्तन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

महाशिवरात्रीच्या पावन कालिका मंदिरात शिवरात्र पर्वानिमित्त बीड शहरात आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सेवेत ह.भ.प. बबन देवा जोशी महाराज (शिरसमार्गकर) यांनी शिवमहिम्याचे सखोल आणि प्रभावी निरूपण करत भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. वर्षामध्ये बारा शिवरात्री येतात; परंतु वार्षिक महाशिवरात्र ही विशेष महापर्वणी आहे. या दिवशी श्रद्धा, भक्ती आणि एकाग्रतेने केलेल्या व्रत-उपासनेमुळे जीवनात आनंद, सुख, शांती आणि समाधान लाभते, असे प्रतिपादन त्यांनी



केले. कीर्तनाची सुरुवात 'शिव भोळा चक्रवर्ती' या अभंगावरून करण्यात आली. निरूपण करताना महाराजांनी भगवान शिव यांच्या भोळेपणाचे, करुणामय स्वभावाचे आणि भक्तवत्सलतेचे अनेक पौराणिक दाखले दिले. शिवमहिम्याचे वर्णन करताना त्यांनी सांगितले की, शिव ही सर्वात दयाळू आणि लवकर प्रसन्न होणारी देवता असून मनापासून केलेली प्रार्थना तो नक्कीच ऐकतो. महाशिवरात्रीचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट करताना महाराज म्हणाले की, या दिवशी दुध-शर्करा योग असून भगवान शिवांचा माता पार्वती यांच्याशी विवाहसोहळा संपन्न झाला होता. या विवाहाची पौराणिक कथा त्यांनी रसाळ आणि ओजस्वी शब्दांत सांगत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. शिवरात्रीचे व्रत केवळ उपवासापुरते मर्यादित नसून मन, वाणी आणि कर्म यांची शुद्धता साधणे हे त्यामागील खरे तत्त्व आहे. मनातील नकारात्मक विचार दूर करून प्रेम, आपुलकी आणि सहकार्याची भावना जोपासली तर जीवन आनंदमय होते, असा संदेश त्यांनी दिला. कीर्तनाच्या उत्तरार्धात शिवरात्र कशी प्रचलित झाली याची आख्यायिका सांगत त्यांनी शिवमाहात्म्य सविस्तर उलगडले. जीवनात विसंगती, वाद-विवाद आणि मतभेद टाळून सर्वांशी प्रेमाने व आनंदाने राहावे, कौटुंबिक कलह टाळावा आणि समाजात सौहार्द जपावे, असा अनमोल सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला. या कीर्तन सेवेला बीड शहरासह कालिका नगर परिसरातील भाविकांची मोठी उपस्थिती लाभली. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या घोषात वातावरण भक्तिमय झाले होते. शेवटी उपस्थित भाविकांनी शिवनामाचा जप करत महाशिवरात्रीची आराधना केली.

# डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त 'कॉपी मुक्त परीक्षा एक आव्हान: वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यामध्ये नैतिक मूल्ये रुजवण्यासाठी आणि परीक्षेतील वाढत्या गैरप्रकारांकडे लक्ष वेधण्यासाठी, सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या लोकप्रशासन विभागातर्फे माजी नगराध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त 'कॉपी मुक्त परीक्षा – एक आव्हान' या विषयावर महाविद्यालयस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. पल्लवी इरलापल्ले आणि प्रा. केदार पी. बी., प्रा. संजय मोरे, प्रा.गणेश कदम हे उपस्थित होते. स्पर्धेत महाविद्यालयातील सुमारे २० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून कॉपीच्या समस्येवर सडेतोड मते मांडली.



वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विविध पैलूंवर प्रकाश टाकला. आधुनिक काळात मोबाईल आणि गॅजेट्सचा वापर करून होणाऱ्या कॉपीमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. केवळ गुणांच्या शर्यतीत टिकण्यासाठी पालक आणि समाज विद्यार्थ्यांवर दबाव टाकतात, ज्यामुळे विद्यार्थी कॉपीकडे वळतात, असे मत अनेकांनी व्यक्त केले. केवळ कायदे करून किंवा कडक बंदोबस्त ठेवून कॉपी थांबणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये 'अभ्यासच यशाचा मार्ग आहे' ही जाणीव निर्माण होणे आवश्यक असल्याचे स्पर्धकांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, कॉपी ही केवळ परीक्षेतील चोरी नसून ती स्वतःच्या भविष्याची केलेली फसवणूक आहे. लोकप्रशासन विभागाने अशा ज्वलंत विषयावर स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देण्याचे उत्तम काम केले आहे. कॉपीमुक्त परीक्षा हे केवळ प्रशासनासमोरचे आव्हान नसून ते संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या शुद्धीकरणासाठी उचललेले एक पाऊल आहे. या स्पर्धेसाठी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए. एस. उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख परीक्षक म्हणून डॉ. यादव घोडके हे उपस्थित होते. यास्पर्धेत प्रथम क्रमांक गायकवाड प्रणिता,द्वितीय क्रमांक शिंदे वैष्णवी , तृतीय क्रमांक पवार प्रियंका यांनी पटकावला तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पल्लवी इरलापल्ले यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. केदार पी. बी. याने केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मोरे संजय यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. आघाव सर, डॉ. शकील सर , प्रा. संजय काळे, डॉ. सय्यद इमामोद्दिन यांनी सहकार्य केले.

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# दैनिक मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन
### नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन दि. १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी यंशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक दर्याभवानी ४० कलाकारांच्या संचात सादरीकरण होणार आहे. तसेच दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १.०० वाजेपर्यंत त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शाहिरी लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

### बीड नगरपरिषद चे मुख्यअधिकारी यांना बीड जिल्हा सत्र न्यायालयातील विविध महत्त्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत निवेदन देताना ॲड तथा नगरसेवक गोविंद शिराळे पाटील



बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेचे मुख्यअधिकारी यांना बीड जिल्हा सत्र न्यायालयातील विविध महत्त्वाच्या प्रश्नाच्या संदर्भामध्ये सदैव न्यायासाठी सातत्याने लढणारे व सर्वांना बीड जिल्हा सत्र न्यायालयाच्या माध्यमातून व आपल्या उत्कृष्ट वकिलीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणारे असे उत्कृष्ट सुसंस्कृत कायद्याच्या बाबतीत अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले ड.तथा स्वीकृत नगरसेवक गोविंद शिराळे पाटील यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद यांना बीड जिल्हा व सत्र न्यायालय मध्ये शुद्ध असे पिण्याचे पाणी व सांडपाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करणे बाबत, न्यायालय परिसरात लाईटची सुरळीतपणे व अखंडित सेवा चालू ठेवणे बाबत, न्यायालय परिषद दैनंदिन साफसफाई करणे बाबत, न्यायालय परिसरात झाडाची व्यवस्था करणे नवीन झाडे लावणे व अस्तित्वात असलेले झाडे आहे त्यांची निगा राखणे, न्यायालय परिसरामध्ये वकिलांना पक्षकारांना व सर्वसामान्य नागरिकांना बसण्याचे सुविधा म्हणून बाकड्याची व्यवस्था करणे बाबत, निवेदन दिले व न्यायालयातील सर्व महत्त्वाचे प्रश्न तात्काळ आपण मार्गी लावावे असे या निवेदनात म्हटले आहे यावेळी त्यांच्या समवेत उपस्थित असलेले बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष पिसोरे साहेब सचिव एडवोकेट सुभाष जी काळे साहेब उपाध्यक्ष रांजण देशमुख व मान्यवर उपस्थित होते.

### अनोळखी प्रेत आढळल्याने खळबळ
### पोलिसांकडून प्रेताची ओळख पटविण्याचे आवाहन



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी नाका परिसरात मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी एक अनोळखी व्यक्ती मृतावस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. बार्शी रोडवरील हिना पेट्रोल पंप समोर असलेल्या OLA Electric दुचाकी शोरूमच्या बाजूला ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. सदर व्यक्ती मृत अवस्थेत आढळून आली असून त्याचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्षे आहे. त्याच्या अंगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदर फोटोमधील व्यक्तीची ओळख कोणाला पटत असल्यास त्यांनी पेठ बीड पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस हेड कॉन्स्टेबल विलास ठोंबरे व अल्ताफ शेख यांनी केले आहे. संपर्क क्रमांक: ९९२३२७३५६८

### उत्कृष्ट निवेदक पुरस्कार मिळाल्याबद्दल महादेव इनकर यांचा भव्य सत्कार



बीड । प्रतिनिधी

पुणे येथे प्रदान करण्यात आलेला उत्कृष्ट निवेदक हा मानाचा पुरस्कार मिळवून आपल्या कार्याची छाप उमटविणाऱ्या महादेव इनकर यांचा शहरात उत्साहात सत्कार करण्यात आला. विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी नगरसेवक प्रमोद अण्णा शिंद, कपिल सौदा, सिद्धार्थ शिंगारे, बंडू निसर्गंध, मायकल वाघमारे, पिंटू गव्हाणे, वंचित बहुजन आघाडीचे नेते संतोष जोगदंड, ईश्वर धनवे, केतन गायकवाड, जानू वाघमारे, दीपक कांबळे, श्याम जाधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मित्रपरिवार आदी उपस्थित होते. मान्यवरांनी महादेव इनकर यांच्या निवेदन कौशल्याचे, प्रभावी आवाजाचे व सामाजिक भान जपणाऱ्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये आपल्या उत्कृष्ट निवेदनातून कार्यक्रमांना वेगळी उंची दिली असल्याचे गौरवोद्गार काढण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत असेच यश संपादन करण्याचा विश्वास व्यक्त केला. सत्कार सोहळा आनंददायी वातावरणात पार पडला.

### श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान महादेव मंदिर या ठिकाणी गेल्या सात दिवसापासून सुरु असलेल्या...

# अखंड हरिनाम सप्ताहाची मोठ्या उत्साहात सांगता



● बीड शहरवासीयांच्या नवसाला पावणारा असा श्री सोमेश्वर महादेव आहे ज्यांची संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये ख्याती आहे असे जागृत असलेले बीड शहरातील बार्शी रोडवरील श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या श्री अखंड हरिनाम सप्ताहाची हजारो भाविकांनी महाप्रसाद सेवन केला व मोठ्या उत्साहात झाली सांगता





बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे असे श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात नऊ तारखेला झाली होती गेल्या सहा ते सात दिवसापासून श्री सोमेश्वर हनुमान मंदिर या ठिकाणी तसेच त्या परिसरामध्ये सर्व आनंदमय पवित्र आणि भक्तीमय वातावरण पाहायला मिळाले या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या सप्ताहामध्ये धार्मिक कार्यक्रमाचे विविध आयोजकांकडून आयोजन करण्यात आले होते यामध्ये सकाळी पाच वाजता काकडा हरिपाठ गाथा भजन श्री विष्णू सहस्त्रनाम श्री भावार्थरामायण इत्यादी महान अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी झाले तसेच प्रवचन सायंकाळी महाराष्ट्रातील नामांकित असणाऱ्या गुन्हिजन हरिभक्त परायण महाराजांचे हरिकीर्तन या ठिकाणी संपन्न झाले त्यांनी सर्व या पंचक्रोशीतील भाविक भक्तांना आपल्या आपल्या उत्कृष्ट ज्ञानातून ज्ञान अमृत पाजले व सर्वांना भाविक भक्तांना हरिकीर्तनाने तृप्त केले असे या मंदिर परिसरामध्ये वातावरण गेल्या सहा दिवसांमध्ये पाहायला मिळाले याच सप्ताहाची सांगता सोमवारी मोठ्या उत्साहामध्ये भगवान श्री सोमेश्वर महादेवाची दिव्य भव्य अशी महापूजा रुद्राभिषेक संपन्न होऊन तसेच या ठिकाणी स्थापित असलेल्या

● महाशिवरात्रीच्या दिवशी प्रसिद्ध असलेल्या बीड शहरातील श्री सोमेश्वर मंदिर संस्थान येथे जवळपास बीड शहरातील जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील ७० ते ८० हजार भाविकांनी दर्शन घेतले तसेच आठ दिवस चालणाऱ्या सप्ताहामध्ये जवळपास ६० ते ६५ हजार भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला व श्रीक्षेत्र सोमेश्वर हनुमान मंदिर येथे जसे की साई बीड येथील संस्थान शिर्डी येथील तसेच चाकरवाडी श्री क्षेत्र नारायण गड भगवानगड पेंडगाव चा मारुती या ठिकाणी गेलेला प्रत्येक भाविक भक्त किंवा गोरगरीब भक्त जे अन्नछत्र चालवले जातेत त्या महाप्रसादाचे सेवन केल्याशिवाय जात नाहीत त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर संस्थान बीड येथे पण आपण भविष्यात दर सोमवारी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी आपण अन्नछत्र या ठिकाणी ठेवणार असल्याचे या श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश उपाध्यक्ष देव देश धर्म या कार्यामध्ये सातत्याने अग्रेसर असलेले असे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी या सप्ताहाच्या निमित्ताने या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व हजारो भाविक भक्तांसमोर आपले उत्कृष्ट सुसंस्कृत मनोगत व्यक्त केले या वेळी येथे हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .

सर्व देव त्यांचे पूजन होऊन मोठ्या उत्साहात या सप्ताहाची सांगता संपन्न झाली या वेळी बीड शहरातील व बीड जिल्ह्यातील हजारो भाविक भक्त या ठिकाणी महाप्रसादासाठी उपस्थित होते या ठिकाणी अतिशय शिस्तीमध्ये सर्व चोक व्यवस्था मंदिर ट्रस्टीच्या वतीने श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले होती या वेळी ट्रस्टीचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाची महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मुंबई प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विश्वस्त यांनी असे उत्कृष्ट धार्मिक कार्यक्रमाचे या ठिकाणी आयोजन करून सर्व येणाऱ्या भाविक भक्तांचे अत्यंत उत्कृष्ट आणि अप्रतिम व्यवस्था या मंदिर ठिकाणी केली होती या ठिकाणी येणाऱ्या भाविक भक्तांना देखील ही चोख व्यवस्था पाहून मंदिर कमिटीच्या या धार्मिक कार्याच्या बाबतीत समाधान व्यक्त केले आणि सर्वांनी श्री सोमेश्वर महादेवाचे शिस्तीमध्ये दर्शन घेऊन सर्वांनी अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेचा महाप्रसाद सेवन केला यावेळी येथे उपस्थित असलेले मंदिर विश्वस्त तथा बीड नगर परिषदेचे नगरसेवक तथा उत्कृष्ट कायदे सल्लागार वकील गोविंद शिराळे पाटील व सर्व हजारो भाविक भक्त व श्री हनुमान मंदिर फाउंडेशन चे सर्व विश्वस्त उपस्थित होते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरपरिषद सीओ, बदली मागू नका!
## बीड शहर बचाव मंचाची शैलेश फडसे यांना विनंती

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंचाच्या वतीने विविध पक्षांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी (सीओ) शैलेश फडसे यांची भेट घेऊन त्यांनी बदली मागू नये, अशी विनंती केली. बीड शहराच्या विकासासाठी त्यांच्या कार्यपद्धतीची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



सीओ शैलेश फडसे यांनी बीडमध्ये रुजू झाल्यापासून नगरपरिषदेच्या कामकाजात शिस्त व पारदर्शकता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. गत मुख्याधिकारी यांच्या कार्यकाळानंतर नगरपालिकेचा कारभार सुरळीत करण्याचे मोठे आव्हान त्यांच्या समोर होते. मात्र, त्यांनी कर्तव्यदक्ष आणि नियोजनबद्ध पद्धतीने प्रशासनाची धुरा सांभाळत कामकाजाला गती दिली आहे. नगरपरिषदेच्या कार्यप्रणालीत सुधारणा घडवून आणण्याचे त्यांचे प्रयत्न आता फलदायी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.विशेषतः नगरपरिषद व्यवस्थेत रूढ झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी तसेच बोगस कंत्राटदार व बोगस बिलांविरोधात उघडलेल्या मोहिमेबद्दल बीड शहर बचाव मंचाच्या वतीने त्यांचे मनापासून कौतुक करण्यात आले. त्यांच्या धाडसी आणि निडर भूमिकेमुळे प्रशासनात सकारात्मक बदल होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

आपण अशाच धैर्याने व प्रामाणिकपणे काम करत राहा. कोणत्याही संकटाच्या वेळी आम्ही आपल्या पाठीशी ठामपणे उभे राहू, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त करून त्यांचे मनोबल वाढविले. यावेळी नगर रोड माने कॉम्प्लेक्स परिसरातील उद्यानाच्या समस्या, काही भागांतील स्ट्रीट लाईट अडचणी तसेच सय्यद अलीनगर येथील दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील मूलभूत सुविधांबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.



*महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे आयोजित ३६ वा अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सप्ताहाच्या सांगता प्रसंगी शांतीब्रम्ह ह.भ.प. तुकाराम महाराज भारती यांच्या काल्याच्या कीर्तनास उपस्थित राहण्याचा लाभ मिळाला. त्यांच्या ओजस्वी व प्रेरणादायी कीर्तनातून अध्यात्म, नामस्मरण आणि भक्तीमार्गाचे महत्त्व अधोरेखित झाले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

# खोदून ठेवलेल्या रस्त्याची कामे तत्काळ करा: बाळासाहेब पिंगळे
## कारंजा टॉवर– पिंगळे गल्ली – जुनी भाजी मंडई रस्ता न झाल्यास बेमुदत ठिय्याचा आंदोलनाचा इशारा



बीड । प्रतिनिधी

शहरात विकास कामाच्या नावाखाली नगर परिषदेने ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत. कारंजा टॉवर – पिंगळे गल्ली – जुनी भाजी मंडई या भागाला जोडणारा मुख्य रस्ता देखील नगर परिषदेने विकास कामांच्या नावाखाली तीन वर्षभरापासून खोदून ठेवला आहे. परंतु या तीन वर्षा भरात या रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे काम सुरू करण्यात आलेले नाही. आपल्या विकासाच्या व्याख्येत बसणाऱ्या कामाच्या या पद्धतीचा आज या भागातील पर्यायाने शहरातील सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. पंधरा दिवसात हा रस्ता सुरु न केल्यास मुख्याधिकारी यांच्या दालनात बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे यांनी दिला आहे. मुख्याधिकारी यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनात त्यांनी हा इशारा दिला आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कारंजा टॉवर – पिंगळे गल्ली – जुनी भाजी मंडई या भागाला जोडणारा मुख्य रस्ता तीन वर्षा पासून खोदून ठेवला आहे. परंतु अद्याप या रस्त्याचे काम सुरू केले नाही. अनेकवेळा निवेदन देऊन, तक्रार करून देखील हे काम सुरू केलेलं नाही. रस्ता खोदून ठेवल्यामुळे अनेक दुचाकी, स्कूटीधारक पडून जखमी झालेले आहेत. अनेकांना गंभीर दुखापत झालेली आहे. रस्त्याच्या लगत असलेल्या नाल्या तुडुंब भरून रस्त्यावर पाणी साचत असल्याने शाळकरी मुले, वृध्द, अपंगाना आज रस्त्यावरून ये जा करणे शक्य नाही.

# अमेरिका करारामुळे कापूस - सोयाबीन भाव कोसळले: राजेंद्र आमटे
## शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने कराराची होळी

बीड । प्रतिनिधी

भारत– अमेरिका करार हा शेतकऱ्यांच्या मुळावर आहे भारतात कापूस सोयाबीन भाव सुधारत असताना अमेरिके सोबत केलेल्या करारामुळे कापूस व सोयाबीन पिकाचे भाव कोसळण्यास भारत अमेरिका करार जबाबदार आहे. भारत अमेरिका यांच्या कृषी करार करण्यात आला या करतात अमेरिकेतील कापूस, सोयाबीन, दूध, मका, गहू, फळ भारत विक्रीसाठी येणार आहेत अमेरिकेतून भारतात येणाऱ्या मालावर ०% कर व भारतातील शेतकरी अमेरिकेत माल घेऊन गेल्यावर भारतीय शेतकऱ्यांना १८% कर का? हा अन्याय नाही का? भारत अमेरिका करार हा द्विपक्षीय करार नसून हा



शेतकरी हक्क मोर्चा हा जिल्हाभर शेतकरी जागृती अभियान राबवणार आहे का करार शेतकऱ्यांच्या मुळावर आहे यासंदर्भात शेतकरी जागृती करणार आहे

अमेरिकेने भारतावर लाभलेला करार आहे हा भारतातील शेतकऱ्याला उध्वस्त करणारा करा भारत सरकारने रद्द करण्यात यावा भारत हे सार्वभौम राष्ट्र आहे भारताने अमेरिकेत समोर झुकण्याची कसल्याही प्रकारची गरज नसताना हा करार शेतकऱ्यावर लादला जात आहे यामुळे शेतकरी देशोधलेला लागेल यामुळे शेतकरी हक्क मोर्चा या कराराच्या विरोधात आहे. भारत अमेरिका करार तत्काळ रद्द करण्यात यावा हा करार शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारा आहे